# जून १९९० - विशेष

| तारीख | वार | | विशेष |
|---|---|---|---|
| २ | शनिवार | – | गंगा-दशहरा, गंगावतार, याज्ञवल्क्य जयंती |
| ४ | सोमवार | – | निर्जला एकादशी, चम्पक द्वादशी |
| ५ | मंगळवार | – | भौम प्रदोष, त्रिविक्रम पूजा, सावित्री व्रतारम्भ (पौर्णिमान्त) |
| ६ | बुधवार | – | शिवराज्याभिषेक दिन, शिवशक ३१७ |
| ७ | गुरुवार | – | सावित्रीव्रतसमाप्ति |
| ८ | शुक्रवार | – | वटपौर्णिमा, रवि मृगनक्षत्रप्रवेश |
| ९ | शनिवार | – | गुरु हरगोविंददास जयंती |
| १० | रविवार | – | त्रिनिटी सन्डे |
| १२ | मंगळवार | – | अंगारक संकष्टी चतुर्थी |
| १५ | शुक्रवार | – | रवि मिथुन प्रवेश, राजस संक्रांति |
| १९ | मंगळवार | – | योगिनी एकादशी |
| २० | बुधवार | – | प्रदोष |
| २१ | गुरुवार | – | रवि सायनकर्क-प्रवेश, शिवरात्रि, विद्यारण्यस्वामी पुण्यतिथि |
| २२ | शुक्रवार | – | भारतीय आषाढ, रवि आर्द्रानक्षत्र प्रवेश, अमावास्या |
| २३ | शनिवार | – | आषाढ प्रारंभ |
| २४ | रविवार | – | श्रीरामरथोत्सव |
| २५ | सोमवार | – | जिल्हेज |
| २६ | मंगळवार | – | विनायक चतुर्थी (अंगारक योग) |
| २८ | गुरुवार | – | कुमार षष्ठी, विवस्वत सप्तमी |

# श्री. माधवराव बळवंत (बाबांच्या शाम्या) देशपांडे शिरडीकर यांचे अल्प चरित्र

**(श्री साईलीला, शके १९६२ कार्तिक अंकावरुन)**
(मागील अंकावरून पुढे चालू)

## माधवरावांचे लाड व लळे

माधवरावांना बाबांनी, श्री तात्या पाटील, बडेबाबा, बयाजी पाटील, रामचंद्र पाटील वगैरे मंडळींप्रमाणे जरी दररोज पैसे दिले नाहीत किंवा कधी एकदम दहा पांच हजार रुपयेहि दिले नाही. इतकेच नव्हे पण श्री. शिंदे सरकार (कै. श्री. माधवरावसाहेब) त्यांना पांच हजार रुपये देत असतां बाबांनी त्यांना तेहि देऊं दिले नाहीत, तरी पण ऐहिक संपत्तीपासून उपभोगण्यास मिळणारे नानाप्रकारचे भोग व ऐश्वर्य ही त्यांना भोगावयास देऊन बाबांनी माधवरावांचे पुष्कळ लाड व लळे पुरविले. अति खर्चाच्या व अत्यंत श्रमाच्या व दगदगीच्या ज्या हिंदुस्थानातील चारी धामाच्या (श्री द्वारका, रामेश्वर, जगन्नाथ, व बद्री नारायण, बद्री केदार, गंगोत्री, जम्नोत्री वगैरे वगैरे) व श्री काशी, अयोध्या, गोकुळ, मथुरा, वृंदावन, गया, हरीद्वार, प्रयाग, उज्जैन, गिरनार, मातृगया, नाशिक, त्रिंबकेश्वर, गाणगापूर, अक्कलकोट, दौलताबाद, पंढरपूर, बालाजी, श्रीरंगपट्टण, कांची, कामाक्षी मधुरा, मीनाक्षी, पक्षीतीर्थ, वगैरे इतर पुज्य व महत्वाच्या यात्रा विनामूल्य बाबांनी अनायासे माधवरावांना आनंदांत, सुखांत व ऐषआरामांत कोट्याधिशांचे व लक्षाधिशांचे सहवासांत करून दिल्या. हत्तीचे अंबारीत माधवरावांना बसवून त्यांची मिरवणूक काढविली. शिंदे सरकार, जव्हार सरकार, कोट्याधीश सावकार, सुखवस्तु लोक, यांचे माधवरावांना काही प्रसंगी सन्मान्य पाहुणे बनवून त्यांना माधवरावांना प्रेमालिंगन घ्यावयास लावून माधवरावांचे पाया पडावयास लाविले. मग माधवरावांच्या फिरण्याच्या, खाण्यापिण्याच्या, उतरण्याच्या व ऐषआरामाच्या थाटास काय विचारावे! या सर्व ठिकाणी बाबांच्या लीला वर्णन करून सर्वांची मने

प्रफुल्लीत व आनंदित करणे व बाबांची प्रसिद्धी करणे हीच माधवरावांची मुख्य कामगिरी.

## माधवरावांनी बजावलेले प्रचारकार्य

माधवराव बहुतेक सर्व हिंदुस्थानांत फिरले व ते जेथे जेथे गेले तेथे तेथे त्यांनी व्याख्याने किंवा प्रवचने दिली नाहीत किंवा कीर्तने केली नाहीत पण त्यांच्या त्या देसोरी पण रसाळ व प्रसादयुक्त वाणीने बाबांच्या पुण्य व दिव्य लीला सर्वांना सांगून त्यांनी श्रोत्यांच्या अंत:करणावर अद्वितीय सगुणावतार संतमहात्म्य बाबांचे महत्व बिंबवून त्यांना बाबांच्या दर्शनाची तीव्र लालसा तळमळ व उत्कंठा लावून दिली. माझ्या मते याप्रकारे माधवरावांनी कै. भक्तसिंह नानासाहेब चांदोरकरांप्रमाणे बाबांच्या प्रचारकार्याची कामगिरी उत्तम प्रकारे बजाविली. पण ही कोणाचे क्वचितच लक्षात आली असेल. नानासाहेब हे सरकारी सेवावृत्तीत असल्यामुळे व त्यांची सेवा विवक्षित ठिकाणीच झाली असल्यामुळे त्यांचे प्रचारकार्य मर्यादित असणे साहजिकच होते. परंतु माधवरावांचे कार्य मात्र आसेतु हिमालयापर्यंत व आद्वारावती जगन्नाथपर्यंत झाले असे म्हणण्यास बिलकूल हरकत नाही. कीर्तने, प्रवचने, व्याख्याने यांचा जसा गाजावाजा होतो तसा माधवरावांचे कार्याचा कोठेही गाजावाजा झाला नाही. पण त्यांचे हातून सहजासहजी मोठे व विस्तृत प्रचारकार्य झाले असे म्हणण्याला मुळीच हरकत नाही.

अर्जुनाला श्रीमद्भगवद्गीता सांगण्याने परमात्म्याने आपले प्रचार कार्य जसं नामाभिधानाने आपले प्रतिनिधित्व देऊन, लीलाकथनाद्वारे माधवरावांकरवी बाबांनी आपले प्रचारकार्य आपल्या अखिल मायभूमीत शांतपणे करून घेतले, यांत शंका नाही.

माधवराव एकदा बाबांना म्हणाले, देवा, ब्रह्मलोक, विष्णुलोक, व शिवलोक हे खरे आहेत का रे? बाबा म्हणाले, 'होय, खरे आहेत श्याम्या.' मग देवा, तू ते आम्हाला का दाखवीत नाही रे? बाबा म्हणाले, 'श्याम्या, ऐहिक ऐश्वर्याप्रमाणे हे देवांचे ऐश्वर्य ही तुच्छ आहे. ते आपल्याला नको.' माधवराव म्हणाले, पण ते आम्हाला दाखीव तर खरे. बाबा म्हणाले, 'डोळे मीट श्याम्या व आता उघड श्याम्या.' माधवरावांनी तसे केले. माधवरावांना स्वर्गीय, दैदीप्यमान, अप्रतिम वैभवयुक्त, डोळे दिपविणारी सुखानंदकारक, भीति व आदर उत्पन्न करणारी, अशी एक भव्य व विस्तृत, रत्नजडित सिंहासनाधिष्ठित ब्रह्मदेवासह मोठी सभा दिसली. बाबा म्हणाले, 'श्याम्या, हा सत्यलोक व हे श्री ब्रह्मदेव बरं का! आता पुन्हा डोळे मीट व उघड.' माधवरावांनी तसे केले. त्यांना वरपेक्षा जास्त सौंदर्य व ऐश्वर्ययुक्त अशी रत्नजडित सिंहासनाधिष्ठित श्री विष्णुच्या मूर्तिसह मोठी भव्य सभा दिसली. 'श्याम्या हा वैकुंठ लोक व हे विष्णु

बरं का! आता पुन्हा डोळे मीट व उघड.' व माधवरावांनी तसे केले. त्यांना अत्यंत प्रेक्षणीय विलोभनीय नयन सुभग अशी रत्नजडित सिंहासनास्थित शंकराच्या मूर्तिसह अत्यंत मोठी सभा दिसली. 'श्याम्या हा कैलास लोक व हे श्री शंकर, बरं का!' असे बाबा म्हणाले. 'पण श्याम्या हे आपल्याकरतां नव्हे. आपल्याकरतां निराळेच आहे', असे बाबांनी माधवरावांना सांगितले. माधवरावांना समाधान वाटले. हे मागणे म्हणजे अर्जुनाच्या विश्वरूपाच्या मागणीप्रमाणे नव्हे का? व डोळे झांक व उघड असे सांगण्याचे माधवरावांना अर्जुनाप्रमाणे दिव्य दृष्टी दिली तशीच नाही कां?

एके वेळी अर्जुनाने परमात्म्याजवळ असेच विलक्षण मागणे केले. अर्जुन म्हणाला, देवा, दोन मार्गापैकी मला असा एक मार्ग सांगा की, मला सोपेपणाने पालखीसारख्या सुखदायक वाहनांत बसून झोप घेत घेत सुखाने पुष्कळ मार्ग क्रमीत मोक्षाला जाता येईल.

"जैसे निद्रेचे सुख न मोडे। आणि मार्ग तरी बहुसाल सांडे॥
तैसे सुखासना सांगडे। सोहपे होय॥८॥

श्री. ज्ञा., अ. ५

परमात्म्यांनी अर्जुनाच्या इच्छेप्रमाणे त्याला कर्ममार्गाचा उपदेश करून मोक्षास जाण्याचा अत्यंत सोपा मार्ग दाखविला.

एकदा अर्जुनाने असाच हट्ट घेऊन परमात्म्याजवळ नौकेत बसून जाण्यापेक्षा किंवा बाहुबलाने पोहून भवसागराच्या पलीकडे जाण्यापेक्षा मधलाच पाय उताराचा मार्ग दाखवा असे मागणे केले.

"येऱ्हवी तरी अवधारा। जो दाविला तुम्ही अनुधारा॥
तो पव्हण्याहूनि पायउतारा। सोहपा जैसा॥१६५॥
म्हणोनि एक वेळ देवा। तोंचि पडताळा घेयावा॥
विस्तारेल तरी सांगावा। साद्यंत चि॥१६७॥

श्री. ज्ञा., अ. ५

त्याप्रमाणे परमात्म्यांनी अर्जुनास हटयोग सांगितला.

तसेच एकदा अर्जुनाने परमात्म्याजवळ नि:शंकपणे मागणे केले की, देवा, तुझ्या सर्वव्यापकत्वाबद्दल मनाची खात्री झाली. पण अद्याप डोळ्याची खात्री होत नाही. तरी डोळ्याची खात्री होईल असे ते तुझे विश्वरूप दाखव.

"म्हणे हे चित्हृदया आतुली प्रतीती! बाहेरी अवतरों कां डोळ्याप्रति॥

ह्या आर्तीचिया पाउली मती। उठती जाहली॥३३१॥
म्हणोनि इहीच दोही डोळां। झोंबावे विश्वरूपा सकळा॥
येवढी हांव तो दैवा आगळा। म्हणवूनि करी॥३३२॥

श्री. ज्ञा., अ. १०

त्याप्रमाणे परमात्म्यांनी जे त्यांनी कधी कोणास दाखविले नव्हते ते विश्वरूप अर्जुनास दाखवून त्याच्या मनाप्रमाणे डोळ्यांचेही समाधान करून त्याचे कोड पुरविले.

वर दिलेल्या माधवरावांच्या व बाबांच्या संवादावरून व माधवरावांस बालवयास लावलेल्या राजैश्वर्यावरून व कधीही कोणास न दाखविलेले अशक्य कोटीतील स्वर्गीय ऐश्वर्य त्यांना दाखवून बाबांनी माधवरावांचे कोड कौतुक पुरविले नाही का?

माधवरावांच्या जन्मापासून आतापर्यंतच्या त्यांच्या परिस्थितीवरून तरी आपले कोणत्याही प्रकारे अति उच्च कोडकौतुक पुरले जाईल असे त्यांच्या किंवा इतरांच्या कधी स्वप्नीही आले नसेल. परंतु बाबांसारखे सद्गुरु सतत ४०-४२ वर्षे लाभल्यावर माधवरावांचे सर्व मनोरथ का पुरे होऊ नयेत?

"देवा तुज ऐसा निजगुरु। आर्तिधणी का न करू॥
एथ भीड कवणाची धरू। तू माय आमुची॥२१॥

श्री. ज्ञा., अ. ३

देखा कामधेनु ऐसी माये। सदैव जया होय॥
तो चंद्रही परी लाहे। खेळावया॥१०॥

श्री. ज्ञा., अ. ५

## माधवरावांचा बाबा खोटे बोलतात म्हणून बाबांवर आरोप

एक दिवस माधवराव बाबांचे जवळ बसले असतां एक इसम बाबांचेजवळ पैसे मागण्याकरता आला. तो श्रीद्वारकामाईत येण्यापूर्वीच बाबांनी आपल्या खिशांतील पैसे आपल्या बसण्याच्या बस्कराखाली घालून ठेविले व त्याला म्हणाले, "आपल्याजवळ पैसे बियसे नाहीत बुवा." असे सांगितल्यावर तो इसम निघून गेला. हा बाबांचा सर्व खेळ माधवरावांनी पाहिला व माधवराव बाबांना म्हणाले, कायरे देवा, तू तर आम्हाला म्हन्तोस की खोटं बोलू नये. आन् तू रे कसं खोटं बोलतोस देवा! बस्कराखाली दडपून ठेवितोस पैसे. आन् त्याला म्हन्तोस आपल्याजवळ पैसे नाहीत बुवा. तू मोठा चांगलाच देव आहेस. बाबा म्हणाले, "पैसे द्यावयाचे नसले

म्हणजे असच कराव लागतं व बोलाव लागतं श्याम्या. यात कसल खोटं बोलणं आहे श्याम्या.''

## माधवरावांचा बाबा चोरी करतात म्हणून बाबांवर आरोप

एकदा एका रामदाश्याचे पोथ्यांचे रुमालातून, बाबांनी त्याला काही काम सांगून बाजारात पाठवून, त्याच्या मागे त्याचा रुमाल सोडून, हळूच विष्णुसहस्त्रनामाची पोथी काढून घेतली. व तो द्वारकामाईत परत येण्यापूर्वीच माधवरावांजवळ देऊन बाबा त्यांना हंसत हंसत म्हणाले, '' श्याम्या, ही ठेव तुला पोथी.'' माधवराव संतापून म्हणाले, ''मला नको ती तुझी पोथी.'' बाबा म्हणाले, ''ठेव ठेव तुलाच ठेव ती श्याम्या.'' यावर माधवराव पुन्हा रागावून म्हणाले, ''देवा, तू सुद्धा खोटं सांगून पोट दुखीचे ढोंग करून अशा चोऱ्या करितो कारे? आपन चोऱ्या करून लोकावर आळ घालितोस व आपन नामानिराळा राहतोस. अरं, कुठं शिकला तू ही खोटं बोलण्याची व चोऱ्या करन्याची इच्छा?'' बाबा म्हणाले, ''श्याम्या, अरे ही कसली चोरी व हे कसलं खोटं बोलणं!'' (श्रीकृष्ण परमात्म्यांच्या गोकुळातील गोपगोपींशी कलागती लावणं, खोटं बोलणं व चोऱ्या करणं, या चरित्राप्रमाणेंच हे बाबांचे चरित्रही गूढ आहे.)

त्यावर माधवराव उद्गारले, ''देवा, तू मोठा देव आहेस. तू खोटं बोललास किंवा चोऱ्या केल्यास तरी तुला येडा, कपटी, खोटा, चोर, कुनी म्हणाव रे देवा? आम्ही आपली येडी मानसं. तू बोलतोस ते ऐकून घेतो व सहनही करितो. तुझं उनं (उणे) कुनी काढावें रे देवा. ते सहन करावं तेच बरं. बरं देवा, तू आम्हाला थापा ही देतोस, गोड गोड ही बोलतोस. बोलतां बोलतां गळ्याची, पायाची आन (आण शपथ) ही घेतोस. अरे, असे नाना तऱ्हेचे चाळे करितोस. तुझ्या बोलन्याला आनू (आणि) करन्याला काही मेळ आहे कारे देवा?''

''श्याम्या, तू रागाऊ नको, जाय, जाय, घे उदी'' बाबा म्हणाले.

''परी राणेपणें शार्ङ्गधरा। बोला हे तुम्ही'' ॥३२३॥

श्री. ज्ञा., अ. १०

''परी तुमचे हे उणे न बोलावे। मी चि साहें तेंचि बरवें॥१६०॥

श्री. ज्ञा., अ. ११

''याचरी सांगो बैससी। का सांगतां भाष ही देसी॥
या तुझिया विनोदासी। पारु आहे जी॥१३७५॥

श्री. ज्ञा., अ. १८

मग म्हणे तुवां न कोपावे। आमुचिया बोला॥३२४॥

श्री. ज्ञा., अ. १०

वर श्री ज्ञानेश्वर माउलींनी वर्णन केल्याप्रमाणे अर्जुन परमात्म्याजवळ व परमात्मा अर्जुनाजवळ मस्करीने व विनोदाने नेहमी गोष्टी करीत. तसाच हुबेहुब हा श्याम माधवांचा (श्याम=माधवराव, व माधव=बाबा किंवा श्याम=बाबा व माधव=माधवराव) विनोदी व थट्टा मस्करीचा संवाद नव्हे काय!

बाबांचे रोजचे टपाल त्यांना वाचून दाखविण्याचे, बाबा सांगतील त्याप्रमाणे त्यांना पत्रांची उत्तरे लिहिण्याचे, बाबांच्या नावावर आलेल्या मनी ऑर्डरी घेण्याचे, व त्यांचे पैसे बाबांना देण्याचे काम काही दिवस माधवरावांकडे होते. एक दिवशी बाबांना देण्याकरतां एका भक्ताने दोन रुपयांची मनी ऑर्डर बाबांकडे पाठविली. माधवरावांनी ती मनी ऑर्डर घेतली. त्यांचे मनांत कपट आले. त्यांनी ते पैसे बाबांना न देता श्री द्वारकामाईंचे रस्त्यावरील मोठ्या दरवाजाच्या बाहेरील भिंतीजवळ पुरून ठेवले. त्यांना वाटले देवाला हे कशाने कळणार आहे? या गोष्टीस बरेच दिवस झाले. माधवरावांचे घरी एके रात्री दोन अडीचशे रुपयांची चोरी झाली. तेव्हा माधवराव दुःखी कष्टी होऊन तळमळूं लागले, पण करतात काय? पुष्कळ तपास केला. पण चोरीचा पत्ता लागला नाही.

## बाबांच्या चोरीबद्दल माधवरावांस शिक्षा

शेवटी बाबांच्या मोठ्या अदालतीत येऊन माधवरावांनी आपले गाऱ्हाणे बाबांचे पुढे घातले व म्हणाले, "देवा, ही बघ माझी गरिबाची दोन अडिचशे रुपयांची चोरी झाली. तुला बरं वाटतं का रे देवा. तुझ्यावाचून आम्ही आपलं गाऱ्हानं कोणाकडे न्यावं रे देवा? बाबांनी ते सर्व ऐकून घेतले व शांतपणे म्हणाले, "अं: श्याम्या यांत काय आहे रे. अरे तुझी चोरी झाली म्हणून तू मजकडे गाऱ्हाणं घेऊन आलास. पण माझी दोन रुपयांची चोरी झाली त्याचं गाऱ्हाणं मी कोणाकडे नेऊं रे श्याम्या?" माधवराव समजले व म्हणाले, "तर मग देवा, माझी चोरी त्वांच करविली काय? अरे, तू मोठा खट्याळ आहेस. तुझ्या दोन रुपयांकरता मला गरिबाला एवढी दोन अडिचशे रुपयाच्या चोरीची शिक्षा काय रे? अरे हा का न्याय आहे का रे देवा?" "श्याम्या, तुला अशी दोन अडिचशे रुपयांची किंमत तशीच मला फकीराला दोन रुपयाची किंमत", बाबा म्हणाले. माधवराव गप बसले.

इतर काही भक्त जसे बाबांची नित्य पूजा करीत, त्यांना न्याहारी देत (जोग बाई, सगुण नाईक) व नैवेद्य ही देत, तसे माधवराव बाबांची प्रत्यक्ष पूजा करीत

नसत किंवा न्याहारी व नैवेद्य ही नेत नसत. तरी त्यांची बाबांवरची अलोट, अनन्य एकनिष्ठ व निस्सीम भक्ती होती. त्यांनी बाबांच्या आज्ञेवरून बाबांकरतां अठरा वर्षे बाबा प्रमाणे ओली भिक्षा मागितली. प्रथम प्रथम काही वर्षे ते बाबांना संत म्हणून जरी मानीत नसत तरी नंतर ते बाबांना पूर्ण ब्रह्म श्री कृष्ण प्रभूची मूर्तिमंत सगुणता मानू लागले. त्यांचे जिव्हेवर बाबांचे नाव निरंतर नाचत असे. त्यांना बाबांबद्दल अत्यंत आदर वाटे. त्यांचा बाबांवर विलक्षण विश्वास व अप्रतिम प्रेम असे. माधवरावांचे चरित्र म्हणजे बाबांच्या ठिकाणी असलेल्या त्यांच्या भक्तीचेच वर्णन होय. श्रीकृष्ण परमात्म विभूती देवर्षि नारद मुनींनी ('देवर्षीणांच नारद्:' श्री. भ. गी. अ. १० श्लो. २६) जी नवविधा भक्ती वर्णिली आहे त्या पैकी माधवरावांची ही आठवी भक्ती होय.

## माधवरावांची सख्य भक्ती

'श्रवणं किर्तनं विष्णोः स्मरणं पाद सेवनं। अर्चनं वंदनं दास्यं सख्य मात्म निवेदनम्॥

विश्वांत पसरलेल्या बाबांच्या अनंत भक्तांत श्री मत्भागवतांत वर्णिलेल्या नवविधा भक्तीपैकी बाबांच्या भक्तांची बाबांवर निरनिराळ्या प्रकारची भक्ती असे व आहे. पण अरे तुरेची व मी तूं ची भाषा वापरून देवाशी अगदी लगट करून शुद्ध विनोदयुक्त भक्ती करणाऱ्या भक्तराज अर्जुनाच्या सख्य भक्तीचा अधुनिक साधुसंतांकडे कोठे नमुना पहावयाचा असेल तर तो एकटच्या माधवरावांच्या ठिकाणीच पहावयास सांपडेल असे मला वाटते.

श्री ज्ञानेश्वर माउलींनी भक्तवर्य अर्जुनाच्या सख्य भक्ती बद्दल असेंच मजेदार व सुंदर वर्णन केले आहे.

'हे असो वय सेचिये शेवटीं। जैसे एकचि विये वांझोटी॥
'मग ते मोहाची त्रिपुटी। नाचो लागें॥१२१॥
'आवडी आणि लाजवी। व्यसन आणि शिणवी॥
'पिसे आणि न भुळवी। तरी ते काई॥१२४॥
'हो कां आत्म निवेदना तळीची। जे पिठीका होय सख्याची॥
'पार्थ अधिष्ठानी तेथीची। मातृका गा॥१२७॥ श्री. ज्ञा., अ. ६

माधवरावही बाबांच्या सख्य भक्तीच्या भूमिकेची मुख्य देवताच होते असे म्हटल्यास फारशी अतिशयोक्ति होणार नाही.

बाबा समाधिस्थ झाल्यानंतर माधवरावांना काही दिवस चुकल्या चुकल्या सारखे वाटून काही सुचेनासे होत असे.

# श्री साईबाबा संस्थान, शिरडी
## श्री साईबाबा संस्थान प्रकाशित पुस्तकांची यादी


| अनु. क्र. | पुस्तकाचे नांव | भाषा | किंमत | पॅकींग व पोस्टेज |
|---|---|---|---|---|
| १. | श्री साई सत्चरित | मराठी | ३१-०० | ९-०० |
| २. | –"– | इंग्रजी | १२-५० | ६-५० |
| ३. | –"– | हिंदी | १६-७५ | — |
| ४. | –"– | गुजराथी | १९-०० | ६-५० |
| ५. | –"– | कन्नड | १३-५० | ८-०० |
| ६. | –"– | तेलगु | १९-०० | ८-०० |
| ७. | –"– | तामीळ | — | — |
| ८. | –"– | सिंधी | २२-०० | ७-५० |
| ९. | श्री साईसत्चरित पोथी | गुजराथी | ३१-०० | १०-५० |
| १०. | श्री साई लिलामृत | मराठी | ९-०० | — |
| ११. | –"– | हिंदी | ११-०० | — |
| १२. | –"– | गुजराथी | ६-६५ | ४-०० |
| १३. | अवतार व कार्य | मराठी | ४-२५ | — |
| १४. | स्तवन मंजिरी | मराठी | ०-६५ | ३-५० |
| १५. | –"– | हिंदी | १-१५ | ३-५० |
| १६. | –"– | गुजराथी | ०-९० | ३-५० |
| १७. | सगुणोपासना (आरती) | मराठी | ०-७० | ३-५० |
| १८. | –"– | हिंदी | १-२५ | ३-५० |
| १९. | –"– | गुजराथी | ०-९५ | ३-५० |
| २०. | –"– | तेलगु | ३-५० | ५-५० |
| २१. | –"– | सिंधी | १-२५ | ३-५० |
| २२. | दासगणूकृत ४ अध्याय | मराठी | १-८५ | ३-५० |
| २३. | सचित्र साईबाबा | मराठी/इंग्रजी | ६-८० | ५-५० |
| २४. | मुलांचे साईबाबा | मराठी | १-५० | — |
| २५. | –"– | इंग्रजी | १-८५ | — |
| २६. | –"– | हिंदी | १-५० | — |
| २७. | –"– | गुजराथी | १-६५ | ३-५० |
| २८. | –"– | तेलगु | २-०० | — |
| २९. | रुद्राध्याय (अ. ११ वा) | मराठी | १-१५ | ३-५० |
| ३०. | साई दि सुपरमॅन | इंग्रजी | ६-०० | ४-०० |
| ३१. | साईबाबा ऑफ शिर्डी (भरुचा) | इंग्रजी | ४-५० | ४-०० |
| ३२. | साईबाबा ऑफ शिर्डी (प्रधान) | इंग्रजी | ३-५० | ४-०० |
| ३३. | रघुनाथ सावित्री भजनमाला | मराठी | १५-२५ | ४-५० |
| ३४. | स्तवनमंजरी | इंग्रजी | १-१० | ३-५० |
| ३५. | शिरडी डायरी (खापर्डे) | इंग्रजी | ९-५० | ४-५० |

जुलै १९९० (किंमत २ रु.

# साईलीला

श्रीसाईबाबा संस्थान, शिरडीचे अधिकृत मासिक

गुरुपौर्णिमा  विशेषांक



गुरुपादुका स्थान

# श्री साईबाबा संस्थान, शिरडी

## विश्वस्त मंडळ

अध्यक्षा

डॉ. लेखा पाठक

श्री. हंसराज शहा
श्री. ब्रिजमोहन भामशा
श्री. शिवराम शिंदे
डॉ. एकनाथ गोंदकर
श्री. भीमाशंकर खांबेकर
श्री. दादासाहेब रोहमारे (पाटील)
श्री. उत्तमराव शेळके
श्री. कारभारी देवकर
श्री. सीताराम पवार
प्रा. ना. स. फरांदे
श्री. दिलीप अ. शिंदे
श्री. श्रीपतराव जाधव
श्री. मनोहर गोगटे
श्री. पृथ्वीराज ग. आदिक
श्री. राजीव प्र. कुळकर्णी
श्री. प्रभाकर तु. बोरावके
श्री. बाबुराव नरोडे (पाटील)
श्री. प्रभाकर बी. बोरावके
श्री. सोपान धोरडे
श्री. अनंतकुमार पाटील
श्री. प्रशांत व्यं. हिरे
श्री. अण्णासाहेब म्हस्के
श्री. गोपिनाथ ब. कोते (पाटील)
श्री. मोहन मो. जयकर



श्री

# साईलीला

श्री साईबाबा संस्थान
शिरडीचे अधिकृत मासिक
श्री साईबाबांच्या
दिव्य संदेशाचा प्रसार


६९ वे) जुलै १९९० (अंक ४ था

भारतीय आषाढ शक १९१२



संपादक
के. पं. क्षीरसागर
कार्यकारी अधिकारी, श्री साईबाबा संस्थान, शिरडी

★ कार्यकारी संपादक ★
डॉ. वि. वा. सातपूरकर
शास्त्री, एम्.ए., पीएच्. डी., पंचांगकर्ता


-: कार्यालय :-
पोस्ट–शिरडी–४२३१०९, जिल्हा–अहमदनगर.
साईनिकेतन, ८०४ बी, डॉ. आंबेडकर रोड, दादर, मुंबई-४०० ०१४.
दूरध्वनि–४१२ २५ ६१



–वर्गणी–
वार्षिक– रु. १०· परदेशीय रु. ११५ तहहयात– रु. ३००
(टपाल खर्चासहित)
किरकोळ अंक– रु. २



या मासिकात प्रकाशित झालेल्या मतांशी संपादक सहमत आहेतच असे नाही




श्री साईलीला

वर्ष ६९ — जुलै १९९० — अंक

आषाढ शालिवाहन शक १९१२

शिवशक ३१७, विक्रमसंवत् २०४६,

हिजरी १४१०-११, फसली १३५९


# अनुक्रमणिका


१. रघुनाथ-सावित्री साईनाथ भजनमाला —

२. सद्विचार —

३. संपादकीय —

४. श्रीगुरुस्तवन —

५. सद्गुरुस्वरूप — वैद्यराज भाऊसाहेब कुलकर्णी

६. संत ज्ञानेश्वर —

७. संत एकनाथ —

८. संत रामदास — सौ. जयश्रीदेवी

९. संत तुकाराम — सौ. प्रविणा कांबळी

१०. साईबाबांचे गुरु गोपाळराव केशवराज बाबासाहेब महाराज —

११. श्री. माधवराव बळवंत (बाबांचा शाम्या) देशपांडे शिरडीकर यांचे अल्प चरित्र —

१२. श्री साईंचे सत्य चरित्र, अध्याय ७ वा — श्री. मु. ब. निंबाळकर

१३. साईभक्तांचे अनुभव — श्री. श. बा. पटवर्धन

१४. वर्षा ऋतु – आहार विहार — वैद्य किरण पां. भावे

१५. दिव्य जीवनाकडे — श्री. चकोर आजगांवकर

१६. विष्णुसहस्रनाम —

१७. महिना विशेष —



# रघुनाथ सावित्री साईनाथ भजनमाला

११४

देवळांत जाणें जनलज्जेसाठीं। अभिमान पोटी खेळतसे।।
कितीएक जाती सहलीकारणें। चावटी करणें हीच बुद्धी।।
कीर्तनप्रसंगी लक्ष गाण्यावरी। हस्त तबल्यावरी चाले कैसा।।
पेटीचाहि सूर फार मौज करी। लक्ष कथेवरी तितुकेंच।।
कर्मणुक झाली त्या वेळेपुरती। पुनः पुनरपि चाले धंदा।।
स्मशानवैराग्य टिके काय गोडी। देवाची आवडी कैसी मिळे।।
दास म्हणे मना दुर्लभ ही संधी। भवाची उपाधी तोडी वायां।।

११५

तारि मला भगवान्। तारी तारी मज या भवसागरि।। तारि मला भगवान्।।
संसाराच्या वाहें पुरीं। द्यावी मातें करुणादोरी। तारि मला भग.।।
दुःखमय भासे अवनी सारी। सुख लपलें तें गिरीकंदरीं।। तारि.।।
देह करितसे पंढरी वारी। षड्रिपु सोबती दूर न सारी।। तारि.।।
अंत न पाही तारी तारी। दास बापुडा आला जेरी।। तारि.।।

# सद्‌विचार

इन्द्रं मित्रं वरुणमग्निमाहुरथो
दिव्यः ससुपर्णो गरुत्मान्।
एकं सद्विप्रा बहुधा वदन्त्यग्निं
यमं मातरिश्वानमाहुः ।।

–ऋग्वेद १-१६४-४६

जाणकार (ऋषि) इन्द्र, मित्र, वरुण, अग्नि, यम, मातरिश्वा तसेच सुपर्ण नामक पक्ष्याला विभिन्न नावांनी पण एकाच ईश्वराला आहुति अर्पण करतात.

श्री साईबाबांनी शिरडीत मानवजातीला उद्देशून म्हटले आहे– ''सबका मालिक एक''

संपादकीय



# मंगलाचरण - ऋग्वेद




## - ऋग्वेदातील देवता -

ऋग्वेदातील देव-देवता या बहुतांश निसर्ग-देवता असल्याचे यापूर्वी सांगितलेले ...व. यास्काचार्यांनी निरुक्तात त्यांची विभागणी केली आहे. भूतलावरील देवता, ...क्षातील व अवकाशापलिकडील अशी तीन विभागात स्थूलमानाने व त्यांच्या ...वरून मांडणी केलेली आहे. भूलोकींच्या देवात अग्नि, नदी, पृथ्वी, बृहस्पति, ... इत्यादि आहेत तर अंतरिक्षात इन्द्र, मरुत, रुद्र, वायु, पर्जन्य, पाणी इत्यादिंचा ...वेश आहे. वरुण, मित्र, सूर्य, सविता, उषा, विष्णु, आदित्य, अश्विनीकुमार इत्यादि ...ची स्थाने अवकाशापलिकडे आहेत. या देवतांचे वास्तव्य त्या त्या प्रदेशात ... असे यास्काचार्यांना सुचवावयाचे आहे. याशिवाय विश्वकर्मा, प्रजापति, क्रोध, ... वास्तु, रात्रि, औषधी, वाचा, श्रद्धा, गाई, बेडूक, पितर यासारख्यांना देवत्त्व ... झालेले ऋग्वेदात दिसून येते. मृत्यूची यमदेवता आहेच.

एक गोष्ट अशी लक्षात येते की बलाढ्य इन्द्राला जे महत्त्वाचे स्थान ...वेदकाळी होते ते आज राहिलेले नाही. इन्द्राचा पराक्रम, त्याचे वज्र, त्याने केलेला ...सुराचा वध, दैत्यांना मारून पर्जन्य मोकळा करणे, या गोष्टींचे वर्णन वाचणाऱ्याचे ... वेधून घेते. त्याच्या शौर्यापुढे आपण नतमस्तक होतो.

विष्णु आपल्या तीन पावलांनी उभे विश्व व्यापतो एवढे वर्णन पुन्हा पुन्हा ... पण आज आपण ज्या विष्णुला, त्याच्या अवतारांना भजतो तो हाच काय? ...ने केलेला दैत्यसंहार, असुरांना मारण्याकरिता व जगरहाटी चालावी म्हणून पुन्हापुन्हा ...तलेले विविध अवतार यांची महती पुराणांनी खूप गायली. भजन, पूजन, अर्चन, ...पासना इत्यादि स्वरूपांत असलेला विष्णु वेदात नाही. शंकर, देवी, गणेश इत्यादि ...ना पुराणांनी इतके प्रभावी केले आहे की "कलौचण्डीविनायकौ" म्हणत म्हणत ... देवांना विसरायला लावले आहे. याच देवता कलियुगात म्हणजे आजच्या ...काळात फलदायी आहेत असे आग्रहाचे प्रतिपादन केलेले आहे. अर्थात् पुराणकारांनी ...त्य वर्णन केलेल्या देव-देवतांच्या प्रारम्भिक स्वरूपाचे आम्हाला स्मरण नाही ...चव. हजारो वर्षांच्या इतिहासात इतके परिवर्तन होऊ शकते. माणूस मात्र आहे ...च आहे. आजही त्याची मागणी कमी झालेली नाही. वाढत्या सभ्यतेबरोबर त्याच्या



मागण्यांची यादी फुगत चालली आहे. 'व्यक्ति तितक्या प्रकृति' तरी मागण्यांची प्रवृत्ति सर्वदूर एकच आहे. माणूस मग तो भारतात वा या पृथ्वीतलावर कोठेही असो, कोठलाही शिक्का त्याने मारून घेतलेला असो त्याची शाश्वत असलेली वृत्तीच ''यज्ञेन यज्ञमजयन्त देवा:'' या ऋचेतून ऋषींनी हजारो वर्षांपूर्वी सांगून ठेवली. जन्माला येणारा प्रत्येक जीव हा आपल्या वासनापूर्तीकरता जगत असतो आणि ती इच्छा सहज वा आपोआप मिळावी असे वाटण्यामुळेच तो यज्ञ करून मागू लागला. त्या एका इच्छापूर्तीतून दुसरी, त्यातून तिसरी अशी ही मानवी जीवनाच्या अंतापर्यंत चालणारी अखण्ड साखळी आहे.

या निसर्गदेवतांबरोबरच अन्य देवताही ऋग्वेदात आहेत. अश्विनीकुमार हे देवांचे डॉक्टर आहेत तसेच ते आमचेही डॉक्टर झालेले आहेत. त्यांच्याजवळ निरामय दीर्घायुष्याची मागणी आहे. पाऊस, नदी, जंगले यांच्याबरोबर बेडकाचीही स्तुती आहे. बेडूक व पावसाचे नाते आज आपण नुसते जाणतो पण प्रत्यक्षात त्यांचा संहार होत असतांना मात्र मूकपणे बघतो. ऋषींनी विज्ञान जाणले होते की नाही व जीवशास्त्राकरिता बेडूक लागतो हे त्यांना माहिती होते की नाही हा प्रश्न आज आम्ही कोणाला विचारणार ? मात्र पावसावाचून ऋषींचे अडायचे व त्याकरिता ते इन्द्रापासून बेडकापर्यंत सर्वांची प्रार्थना करीत. त्यांचे काम झाल्याचे त्यांनी नमूद केलेले आहे.

## द्रष्टे ऋषि

ऋग्वेदातील मंत्र वा सूक्ते यांची रचना ऋषींनी आपण स्वत: केल्याचे कोठेही म्हटलेले नाही. स्वत:कडे कर्तेपण न घेता आपण ते ऐकले एवढेच ते सांगतात. तरीही हे वाङ्मय हजारो वर्षे टिकले. वेदांना 'श्रुति' म्हणतात. श्रुति म्हणजेच ऐकलेले. हे ऐकीव वाङ्मय पिढ्यान्-पिढ्यांना प्रेरणा देत गेले. कॉपी-राईट व मोबदला यांच्या जमान्यात आम्हाला या वाङ्मयाचे मोल राखता आले नाही. परकियांनी मात्र ते जोखले. त्याचा अभ्यास त्यांनी केला व जे पाहिजे ते त्यांतून घेतले.

विख्यात पाश्चात्य विद्वान मॅक्स मुलरने म्हटले आहे, ''जगाच्या इतिहासात वेदांनी असे स्थान प्राप्त करून घेतले आहे की जे कोठलेही अन्य भाषेतील वाङ्मय घेऊ शकत नाही. ज्या काळाचा मागोवा घेणे केवळ अशक्य अशा पिढ्यान्-पिढ्या मागे हा वेद आपणास घेऊन जातो. त्या काळाची कल्पना करणे ही देखील अवघड समस्या आहे. जोपर्यंत माणूस हा मानव जातीच्या इतिहासात रस घेऊ इच्छितो, जोपर्यंत माणूस प्राचीन गतकाळाची स्मारके जतन करू शकतो व आपल्या संग्रहालयात असे ग्रंथ लावून ठेवतो, त्यात ऋग्वेद हा पहिल्या रांगेत प्रथम क्रमांकावर अनंत काळ राहील.''

काश्यप, अत्रि, अगस्ति, अंगिरस, कण्व, गृत्समद, भार्गव, भारद्वाज, वसिष्ठ,

वामदेव, प्रगाथ, विश्वामित्र ही त्यापैकी कांही ऋषींची नावे आहेत. त्यांतील अत्रि, वसिष्ठादि ऋषींच्या नावावर मंडळेही आहेत. आपण मंगलाचरणाची परंपरा सांगण्याकरिता ऋग्वेदाकडे वळलेलो आहोत. त्याची थोडीफार ओळख व्हावी म्हणून हा प्रपंच केला. आता त्यांतील पहिल्या सूक्ताकडे वळू या.

## अग्निमीळे

ऋग्वेदाचा प्रारंभ अग्नीच्या स्तुतीपासून आहे. ''आम्ही अग्नीची स्तुती करतो'' असे या सूक्ताच्या ऋषीने (विश्वामित्राचा मुलगा मधुच्छंद) म्हणत वेदांना सुरुवात केली आहे. अग्नि म्हणजेच उष्णता, प्रकाश, शक्ति, तेज, त्यापासून प्रारंभ आहे. पृथ्वी हा सूर्यापासून अब्जावधी वर्षापूर्वी तुटलेला अग्नीचा गोळा होता असे आजचे विज्ञान सांगते. ऋषींनी वेदांची सुरुवातच अग्नीपासून केली आहे. या अग्नीचे विशाल स्वरूप म्हणजे आज आम्ही ज्याला 'ऊर्जा' म्हणतो. ऊर्जा वजा केली तर या अफाट विश्वाचे स्वरूप काय राहील? हा प्रश्न कल्पनेच्या बाहेरचा आहे. आजच्या विज्ञानापुढेही 'ऊर्जा' हा लाखमोलाचा प्रश्न झालेला आहे.

अग्नीची स्तुती, तो देवांचा पुरोहित, त्यांना (निरनिराळ्या देवतांना) ऋषींची यज्ञात अर्पण केलेली द्रव्ये पोहोचवितो, इच्छिलेली अफाट संपत्ति देतो, इत्यादि गुणगानाने करून, पूर्वी तू दिलेले आहेस तेव्हा आताही दे अशी प्रार्थना आहे. प्राचीन काळात निर्माण झालेल्या यज्ञसंस्थेचा अग्नि हा प्रमुख घटक. त्याला वगळून यज्ञाची कल्पनाच करता येत नाही. तसेच यज्ञातील पहिली आहुतीही त्यालाच इतके अग्नीचे महत्त्व असल्याने त्याच्या स्तुतीपासून वेदारम्भ झालेला आहे. ऋषींनी घालून दिलेली परंपरा आजतागायत चाललेली आहे. आजचे वाङ्मय मंगलाचरणाबद्दल आग्रही नाही पण प्रस्तावना, अर्पणपत्रिका, पुरस्कार इत्यादि नानाविध मार्गांनी त्यांची सुरुवात आहे. कागदावर अवतरले नाही तरी मनोमन प्रार्थना हा प्रत्येक जण करीत असतोच. त्याचे स्वरूप कदाचित भिन्न असेल. यश मिळावे, कार्य निर्विघ्नपणे पार पडावे असे सर्वांनाच वाटते पण ही निर्विघ्नता माणसाच्या हातात आहे काय? असती तर तो असली धावाधाव कशाला करील? आजच्या युगात विज्ञानाने परमेश्वराची आम्हाला आठवण ठेवू दिलेली नाही. पण म्हणून सर्वकाही व्यवस्थित आहे असे थोडेच आहे. नव्या युगाच्या नव्या समस्या आमच्यापुढे आ वासून उभ्या आहेतच. आम्हाला मार्ग सापडत नाही म्हणून आम्ही बाबांपुढे नतमस्तक होतो. आमचे काम होते. लाखो लोकांचा हा अनुभव खोटा आहे काय? ऋषींजवळ होता तो कबूल करण्याचा प्रांजळपणा आमच्यात नाही इतकेच!

(क्रमश:)

- डॉ. वि. वा. सातपूरकर, कार्यकारी संपादक

# श्रीगुरुस्तवन

अखंड मंडलाकारं व्याप्तं येन चराचरम्। तत्पदं दर्शितं येन तस्मै श्री गुरवे नमः॥

अज्ञानतिमिरान्धस्यज्ञानांजनशलाकया। चक्षुरुन्मीलितं येन तस्मै श्री गुरवे नमः॥

गुरुर्ब्रह्मा गुरुर्विष्णुः गुरुर्देवो महेश्वरः। गुरुः साक्षात् परंब्रह्म तस्मै श्री गुरवे नमः॥

स्थावरं जङ्गमं व्याप्तं यत्किंचित् सचराचरम्। तत्पदं दर्शितं येन तस्मै श्री गुरवे नमः॥

चिन्मयं व्यापि यत्सर्वं त्रैलोक्यं सचराचरम्। तत्पदं दर्शितं येन तस्मै श्री गुरवे नमः॥

सर्वश्रुतिशिरोरत्नविराजित पदाम्बुजः। वेदान्ताम्बुजसूर्योयस्तस्मै श्री गुरवे नमः॥

चैतन्यः शाश्वतः शान्तो व्योमातीतो निरंजनः। बिन्दुनादकलातीतस्तस्मै श्री गुरवे नमः॥

ज्ञानशक्तिसमारूढः तत्त्वमाला विभूषितः। भुक्तिमुक्तिप्रदाताय तस्मै श्री गुरवे नमः॥

अनेकजन्मसम्प्राप्तकर्मबन्धविदाहिने। आत्मज्ञानप्रदानेन तस्मै श्री गुरवे नमः॥

शोषणं भवसिन्धोश्च ज्ञापनं सारसम्पदः। गुरोःपादोदकं सम्यक् तस्मै श्री गुरवे नमः॥

न गुरोरधिकं तत्त्वं न गुरोरधिकंतपः। तत्त्वज्ञानात् परं नास्ति तस्मै श्री गुरवे नमः॥

मन्नाथः श्रीजगन्नाथः मद्गुरुः श्रीजगद्गुरुः। मदात्मा सर्वभूतात्मा तस्मै श्री गुरवे नमः॥

गुरुरादिरनादिश्च गुरुः परमदैवतम्। गुरोः परतरं नास्ति तस्मै श्री गुरवे नमः॥

ध्यानमूलं गुरुर्मूर्तिः पूजामूलं गुरोः पदम्। मंत्रमूलं गुरोर्वाक्यं मोक्षमूलं गुरुकृपा॥

नित्यं शुद्धं निराभासं निराकारं निरंजनं। नित्यबोधचिदानन्दं गुरुब्रह्म नमाम्यहम्॥

संसारवृक्षमारुढाः पतंति=नरकार्णवे। येनधूतंजगत्सर्वं तस्मै श्री गुरवे नमः॥

नमामि सद्गुरुं शान्तं सच्चिदानंद विग्रहम्। पूर्णब्रह्मपरानन्दईशमालंदिवल्लभम्॥

आनंदमानंदकरप्रसन्नं ज्ञानस्वरूपं निजबोधरुपम्।
योगींद्रमीडचंभवरोगवैद्यं श्री सद्गुरुं नित्यमहं नमामि॥

सद्‌गुरु माहात्म्य

# सद्‌गुरु स्वरूप

- वैद्यराज भाऊसाहेब कुलकर्णी,
मुंबई.

ब्रह्मानंदं परम सुखदं केवलं ज्ञानमूर्तिं।
द्वंद्वातीतं गगनसदृशं तत्त्वमस्यादिलक्षम्।।
एकं नित्यं विमलं अचलं सर्वधी साक्षिभूतम्।
भावातीतं त्रिगुण रहितं सद्गुरुं तं नमामि।।

सत् म्हणजे सतत असणारे तत्त्व व गुरु म्हणजे सर्वात मोठे असणारे तत्त्व. सतत असणाऱ्या आणि सर्वात मोठे अशा तत्त्वाला सद्गुरु म्हणून शास्त्राने संबोधिले आहे. अशा सतत् (सत्य) असणाऱ्या तत्त्वाशी संबंध असण्याशी मानवाला कर्तव्य काय? प्रत्येक मानव हा क्षणभंगूर असल्याची जाणीव जेव्हा मानवास होते तेव्हा तो त्या क्षणभंगूरतेतून सुटण्याची इच्छा करतो. आपण सतत् असावे हा भाव मानवाला उपजतच असतो; ज्या भूमिकेवरून तो ही इच्छा करतो ती भूमिका मात्र क्षणिक असते. आपला मानवी देह, मन, बुद्धि, अंत:करण ही सर्व क्षणिक आहेत हा प्रत्यय प्रत्येकाला स्वानुभवाने येत असतो.

बुद्धिचे सहाय्याने विचारी मनुष्य सतत् असणारे तत्त्व शोधू लागतो. '**यो माम् सतत युक्तानाम् भजति माम् अनन्य भाक्। साधुरेव समंतव्य:।**' तसेच '**क्षिप्रं भवति धर्मात्मा**' या गीता वचनांच्या आधाराने आपल्यात सतत असणाऱ्या अशा तत्त्वाचा शोध घेऊ लागतो.

हे शोधीत असताना त्याला समजू लागते की, आपला देह हा सततचा नाही. '**यत् दृष्टं तं नष्टं।**' शरीर हे वारंवार झिजत आहे हा अनुभव येतो. देह नाहीसे झालेले मृत्यूचे प्रसंग त्याला प्रत्यक्ष दिसतात – तसेंच झोपेत, बेशुद्ध अवस्थेत मनाचा व बुद्धिचा संबंध सुटलेला असतो हे मनुष्य अनुभवितो, तसेंच निद्रावस्थेत मन बुद्धिचा लय झालेला असतो. सतत असणारे तत्त्व जे झोपेला जाणते, म्हणजे झोपेतून जागे झाल्यावर 'मी' स्वस्थ होतो. मला काही कळले नाही म्हणतो, म्हणजे काही न कळणे हे कळाले म्हणतो. स्वप्नांत स्वप्न पाहतो व जागेपणीचे सर्व व्यवहार करतो. जागे झाल्यावर स्वप्न काय पाहिले हे सांगतो, तसेंच स्वस्थ झोंप आली हेही सांगतो.

यावरून झोपेतला, काही कळले नाही हा बोध, स्वप्नातले स्वप्न काय पाहिले ही स्मृती जागे झाल्यावर येते. यावरून जागृत, स्वप्न, सुपुप्ति ह्या तिन्ही अवस्थांना जाणणारी एकच शक्ती आहे हे सिद्ध होते. अशी जी शक्ती तीच सत्य व सर्वात व्यापक अशी आहे हे सिद्ध होते. ही सत्य व व्यापक म्हणजे सर्वात मोठी वस्तू म्हणून तिला सद्गुरु म्हणून शास्त्राने संबोधिले आहे. या शक्तीचा बोधच फक्त प्रत्येक मानवास आपल्या शरीराच्या क्षणभंगूर अशा दुःखातून सोडवू शकेल.

श्री तुकाराम महाराज यांनी देवाची प्रार्थना केली आहे, **'देव वसे चित्ती। त्याची घडावी संगती। हेंचि आवडे मना। देवा पुरवावी वासना॥'**

या प्रार्थनेवर श्री पांडुरंग तुकाराम महाराज यांना विचारतात–तू माझ्या प्राप्तीकरिता माझे स्मरण, चिंतन करीत असून ज्यांचे हृदयी देव आहे अशांची (सद्गुरुची) संगतीची का इच्छा करतोस?

त्यावर तुकाराम महाराज म्हणतात–तूं सर्वत्र सगळीकडे असूनही आम्हास कळत नाही. तो कळण्याकरिता (तूं कसा आहेस हा बोध देणारे) सद्गुरु म्हणजे ज्यांना तू कळला आहेस (ज्यांचे चित्तात तूं आहेस हा निश्चय झाला आहे) अशांची संगती मला हवी आहे. म्हणजे संगतीने तुझे स्वरूप आम्हाला कळेल. आमच्या डोळ्यांनी आम्ही सर्व जग पहात असतो पण आमचे कपाळावरचा पडलेला काळा डाग आम्हास दिसू शकत नाही, तो कोणी तरी सांगावा लागतो. आकाशाला व्यापून असणारी आत्मवस्तू दृश्य-द्रष्टा या नियमानें समजणारी नव्हे तर ती दाखविण्यास ज्या व्यक्तीला त्या वस्तूचा बोध झाला आहे, तिनेच ती पटवून द्यावी लागते. अशी व्यक्ती म्हणजेच सद्गुरु होय.

सतगुरुचें स्वरूप व कार्य देवापेक्षा फार व्यापक आहे. म्हणूनच संत तुलना करतात–**गुरु गोविंद दोनो खडे किसी के लागू पाव। बलीहारी गुरुदेव की जिनें गोविंद दियो बताय॥** यांत गोविंदापेक्षा म्हणजे देवापेक्षा गुरुचे कार्य व महात्म्य महान आहे हेंच दाखविले आहे.

गोविंदाच्या (देवाच्या) ज्ञानाला सतगुरुची अत्यंत आवश्यकता आहे हे यांत दर्शित केले आहे.

## सद्गुरु स्वरूप

**जीव एकदेशी बापुडे। तयासि ब्रह्मचि करि रोकडे।**
**फेडी संसार सांकडे। वचन मात्रें॥**

**मुख्य सतगुरुचे लक्षण। आधी पाहिजे विमल ज्ञान।**
**निश्चयाचे समाधान। स्वरूप स्थिति॥**

जो निजांगे परिपूर्ण। अभंग जयाचे समाधान।
स्वानुभवे तृप्ति गहन। तोचि सद्गुरु।।
जो ब्रह्मज्ञान उपदेशी। अज्ञान अंधार निरसी।
जीवात्मया शिवात्मयासी। ऐक्यता करी।।
फोडोनि शब्दांचे अंतर। वस्तु दाखवी निजसार।
तोचि सद्गुरु माहेर। अनाथांचे।।
किंबहुना सर्वसुखी। भजिजो आदिपुरुषी। अखंडित -

ज्ञानेश्वर

सर्वसुखी असावे असे वाटणेही सद्गुरुच्या बोधाची परिणती आहे. बोधानंतर होणारा हा वृत्तीचा बदल आहे– '**आत्मवत् सर्वभूतेषु य:पश्यति पश्यति।**' ही सद्गुरुबोधानंतर जगाकडे पहाण्याची वृत्ती आहे. '**जागृति स्वप्न नाठवे। पाहता रूप आनंद साठवे।**' (ज्ञानेश्वरी). तिन्ही अवस्थेनंतरच्या वाचे वर्णन सद्गुरु स्वरूपाची स्पष्ट कल्पना देतात. '**तुका म्हणे घालू जीवपणा जाऊ त्या माहेरा निजाचिया।।**' तुकारामांनी सद्गुरुचे स्वरूप आपले माहेर केले आहे.

'**देव भेटे जनि, वनि, मनि**' या अभंगात ज्ञानोत्तर दृष्टि कशी व्यापक होते दाखविले आहे. निसर्गात मानवी मन नाहीं. मानवी मनाला देवास भेटता त्याच्या स्वरूपाविषयी निश्चय करता येतो. म्हणूनच मानवी मनाचे महत्त्व आहे. निश्चयाला मनच उपयोगी आहे. म्हणूनच '**देव भेटे मनी**' असे संतवाक्य आहे. मनातच आत्मनिश्चय व्हावा लागतो. त्यानंतरच त्या दृष्टिने जनी व मनी मनुष्य

**मनसा मन आलोक्य स्वायमात्मा प्रकाश्यते।**

यात मनाचे महात्म्य दिग्दर्शित केले आहे. परमेश्वरी तत्त्व हे सर्वत्व व्यापलेले अनंत कोटी ब्रह्मांडे उत्पन्न होऊनही ते तत्त्व त्यात अडकून पडलेले नाही. आहे तर जीवाने तरी व्यक्तिगत वासनेत व मनोमन कल्पिलेल्या जगाच्या अडकलो असे का समजावे ? जीवाचे सत्यस्वरूप जर परमेश्वरी तत्त्वाशी एकरूप अलिप्त आहे तर जीवाने आपण बद्ध आहोत असे का समजावे? '**जीवो नापर:**'. बद्धतेचा भ्रम फक्त आहे. तो भ्रम आहे हे लक्षांत आले की भ्रमातून मुक्त होतो. संत म्हणतात – नसे बद्धतेची वार्ता, हेच सत्य आहे. ही जाणीव करून देतात.

सद्गुरुच्या देहाची सेवा म्हणजेच फक्त गुरुभक्ति असा अर्थ श्री गुरुदेव रानडे पटत नाही. गुरुभक्ति म्हणजे आत्म्याची भक्ति – आत्मज्ञानाकरिता धडपड करणे

याला ते गुरुभक्ति म्हणतात. रानडे यांनी केलेली योगाची व्याख्या व भक्ती व्याख्या—'सत्याचा शोध घेण्यासाठी लागणारी क्रियाशील साधना होय व त्याच परिणाम अखिल मानवतेविषयी वाटणारे प्रेम' हा सद्गुरुपदेशाचा परिणाम. 'स खल्विंद ब्रह्म'.

'इन्द्रियाणि परेण्याहु: इन्द्रियेभ्य: परं मन: ।
मनसस्तु परा बुद्धि: यो बुद्धे: परतस्तु स: ।।

हे सद्गुरुचे स्थान स्पष्ट करतात.

देहपात होण्यापूर्वी देहभाव तो नष्टावा
यासाठीच सद्गुरुस्मरणाचा अभ्यास सदा ठेवावा
आत्मस्वरूपी बुद्धि ज्याची मोह न त्याला केव्हाही
शोकही नाही जीवनरीति आदर्शाची आहे ती.'

हा सद्गुरुबोधाचा परिणाम दाखवतात.

सद्गुरुस्वरूप मनात वास्तव्य करीत असूनही आपण त्याला जाणू शकत नाही तेच आपले सद्गुरुस्वरूप आहे. तेच परमतत्त्व मनाला क्रियाशील बनविते. सर्वांतर्यामी वास्तव्य करणारे सद्गुरुस्वरूप होय.

व्यक्तिगत मनाचा व्यवहार मीपणाच्या जाणीवेतून सुरु होतो. ती जाणीव झाली की व्यष्टि मनाचे समष्टि मनात रूपांतर होते. त्यावेळी त्याला सद्गुरु स्वरूप बोध होतो.

'ज्ञानदेव म्हणे शिव तेचि शक्ति। पहाता व्यक्ति व्यक्त नाही।'
'कांही न करणे ही तुझी सेवा। काही नव्हेसि ते तूचि देवा।'
'नेणिजे ते तुझे रूप। जाणिजे तितुके पाप गा देवा।'
'स्तुति ते तुझी निंदा। स्तुतिजोगा नाहीसी गोविंदा।'

हे सर्व सद्गुरुशी एकरूप झाल्याचा परिणाम दर्शवितात.

'आता ब्रह्मज्ञानाची किल्ली। सांगेन एक्याची बोली।
जयाची कल्पना निमाली। ते प्राप्त पुरुष।।'

यात सद्गुरुची जाणीव दिसते. तुकाराम महाराज म्हणतात—

'आता कोठे धावे मन। तुझे चरण देखिलिया।'

हे सद्गुरुबोधानंतरच्या वस्तुस्थितीचे मनन आहे.

# संत ज्ञानेश्वर

यदक्षरमनाख्येम् आनन्दमनकेवलम्।।
श्रीमन्निवृत्तिनाथेति ख्यातं देवतमाश्रये।।१।।
गुरुरित्याख्यया लोके साक्षाद्विधा हि शांकरी।
जयत्याज्ञा नमस्तस्यै दयार्द्रायै निरंतरम्।।२।।

सद्गुरुचे वर्णन संतांनी अतिशय बहारीचे केलेले आहे. कृतज्ञतेने संतमंडळी समोर भारावून गेलेली आहेत. इतकेच नव्हे तर त्यांना आपली वाचा अपुरी आहे, असेही जाणवले. त्यामुळे मोजक्या शब्दात पण अंत:करणाची भाषा करणारे असे शब्द त्यांनी योजले आहेत. साखरेची गोडी कशी आहे? असे ल्यावर जसे सांगणाऱ्याला गडबडल्यासारखे होते, त्याची वाणी अडखळते आणि ल्यावाटे सांगण्याऐवजी प्रत्यक्ष अनुभव घ्या असे सांगतो. अर्थात अशाही र्थीत वर्णन करणारा जर सरस्वतीचा पाइक असेल तर गोष्ट निराळी.

ज्ञानेश्वर हे महाराष्ट्राचं आद्यदैवत. त्यांना प्रेमाची मूर्ति म्हणून 'माऊली' या संबोधले जाते. ते केवळ संतश्रेष्ठच होते असे नसून तुकाराममहाराजांनी त्यांचे न-

ज्ञानियांचा राजा गुरु महाराव।
म्हणती ज्ञानदेव तुम्हां ऐसें।।१।।

असे केलेले आहे. तसेच एकनाथांनीं त्यांचे वर्णन –

कैवल्याचा पुतळा। प्रगटला भुतळा।
चैतन्याचा जिव्हाळा। ज्ञानोबा माझा।।२।।

व नररुपें विष्णु अवतरला हा भगवान। असे केलेले आहे. सर्व संतांनी मान ज्ञानेश्वरमहाराजांना मुक्त कंठांनी दिलेला आहे. यावरून त्यांची योग्यता येते. अशा या संतश्रेष्ठाने आपल्या सद्गुरुबद्दल म्हणजेच आपल्या मोठ्या दल आपले भाव कसे प्रगट केले असतील हे जाणल्यास अनायासे गुरुसेवा चे पुण्य पदरी पडेल.

यंदाचे वर्ष हे ज्ञानेश्वरीचे सप्तशताब्दी वर्ष आहे. सातशे वर्षापूर्वी म्हणजे शके १२ मध्यें ज्ञानेश्वरमहाराजांनी नेवासे येथे ज्ञानेश्वरी सांगितली आणि ती च्चिदानंदबाबांनी लिहून घेतली. १८व्या अध्यायाच्या शेवटी त्याचा उल्लेख ज्ञानेश्वरीत

केलेला आहे.

**शके बाराशतें बारोत्तरें। तैं टीका केली ज्ञानेश्वरें।**
**सच्चिदानंद आदरें। लेखकु जाहला।।**

ज्ञानेश्वरी हा भगवद्‌गीतेवरील अभूतपूर्व असा टीका ग्रंथ आहे. अर्थ भगवद्‌गीतेवरील टीका असल्यामुळे ग्रंथाचा विषय प्रामुख्याने भगवद्‌गीता हाच राहि आणि ग्रंथाच्या विषयाला एकापरीने मर्यादा आली. ज्ञानेश्वर महाराजांच्या भव्य प्रतिभे साक्षात्कार ज्ञानेश्वरीत पदोपदी होत असला तरी त्यांची दिव्य प्रतिभा मात्र 'अमृतानुभ या त्यांच्या स्वतंत्र ग्रंथामधून पहावयास मिळते. त्याची झलक त्यांच्या 'चांगदेवपास हरिपाठ, अभंग, गौळणी इत्यादि रचनेतून सापडतेच. असे सांगतात की, ज्ञानेश्वरां मागे शब्द आपला उपयोग करावा म्हणून तिष्ठत असत.

त्या प्रत्येक रचनेमध्यें ज्ञानेश्वरांनी सद्‌गुरुंचें स्मरण, वर्णन, केलेले आहे. त्यां अंत:करण कृतज्ञतेने भरून आलेले आपणांस दिसते. त्यांनीं केलेल्या सद्‌गुरु वर्णना अमृतानुभव या ग्रंथातील मागोवा आपण घेऊ या.

लेखाच्या आरंभी ज्ञानेश्वरांनी अमृतानुभवाच्या प्रारंभी केलेले सद्‌गुरुचे वं आहे. त्यामध्ये ज्ञानेश्वरांनीं आपण कुठल्या दैवताच्या आश्रयाने वाढलो याचे व केले आहे. हे दैवत अविनाशी, आनंदस्वरूप, एकमेवाद्वितीय असे निवृत्तीनाथ नांवा आहेत. हे सद्‌गुरु म्हणजेच साक्षात् ब्रह्मविद्या आहे असे ज्ञानेश्वरांनी नमूद केले आ शिवशक्ती प्रकरणानंतर ज्ञानेश्वरांनी दुसऱ्या प्रकरणांत सद्‌गुरुंचें स्तवन केलेले आ ते संपूर्ण प्रकरण ज्ञानेश्वरांनी निवृत्तीनाथांच्या स्तुतीपर केले आहे. सुरुवातीला-


**आतां उपायवनवसंतु। जो आज्ञेचा आहेवतंतु।**
**अमूर्तचि परि मूर्तु। कारुण्याचा।।१।।**
**मोडूनि मायाकुंजरु। मुक्तिमोतियाचा बागेरु।**
**जेवविता सद्‌गुरु। निवृत्ति वंदूं।।२।।**

साधनेच्या उपायरुपी वनांमध्यें सद्‌गुरु हे वसंत ऋतु आहेत. त्यातून फुलले कृपा ही सौभाग्य चिन्हांप्रमाणें शाश्वत स्वरुपाची आहे. ह्या सगळ्या क्रिया प्रत्यक्ष मूर्त परंतु अमूर्तच आहेत. कापूर आणि कापराचा रवा हे जसें भिन्न नाहीत त सद्‌गुरु आणि कारुण्यानें ओथंबलेली कृपाही भिन्न नाहीत. मायारुपी हत्तीचा ना करुन त्याच्या गण्डस्थळावरील मुक्तीच्या मोत्याचा घांस निवृत्तीनाथांनी ज्ञानेश्वरां दिलेला आहे. आपली आई लहान मुलांना जसे अन्न भरवते तसे सद्‌गुरुने आपल्याला भरवले आहे. अशा सद्‌गुरु निवृत्तीनाथांना ज्ञानेश्वरांनी वंदन केलेले आहे.

बोधचंद्राचिया कळा। विखुरलिया येकवेळा
कृपापुनीव लीला। करी जयाची।। (२-७)
जो भेटलियाचे सवे। पुरति उपायांचे धावे।
प्रवृत्तिगंगा स्थिरावे। सागरीं जिये।। (२-८)

चंद्र वेगवेगळ्या कलानें एकत्रित पौर्णिमेला पूर्णविंबाने जसा एकरुपानें प्रकाशतो तसे विविध प्रकारच्या वेळांवेळी केलेल्या बोधरुपी कलांनी सद्गुरु आपली कृपा पौर्णिमेला एकरुपानें मोदित करतो. चंद्राचे परिपूर्ण दर्शन हे पौर्णिमेला होणार. इतर वेळी त्याचे दर्शन खंडीत स्वरूपात होणार. ज्ञानाचे अनेक विषय असल्यामुळे व प्रत्येक शास्त्राचा विषय स्वतंत्र रुपाने प्रगट होत असला तरी ह्या सर्व ज्ञानाची अथवा ज्ञानविषयाची ओळख अथवा त्याची अंतिम परिणती होणे शेवटी जरुरीचे आहे. अन्यथा त्या विशिष्ट ज्ञानविषयाला परिपूर्ण समजणे धोक्याचे आहे. चंद्राचे संपूर्ण स्वरुप यथार्थानि पौर्णिमेला चंद्राचा उदय झाल्यावर जसे आपल्या लक्षांत येते व चंद्राच्या सौंदर्याशी आपण एकरुप होतो तसे सद्गुरुरूपाने पौर्णिमा चंद्र प्रगट होतो. ज्ञान, भक्ती, कर्म, उपासना इत्यादि अनेक मार्ग मनुष्याच्या कल्याणाचे असले व त्या प्रत्येकाचा ठाव घेण्याचा प्रत्येक जीव प्रयत्न करीत असला तरी सद्गुरु मात्र ह्या सर्व विषयांचा वा मार्गांचा एकत्रित बोध आपल्या शिष्यास करुन देतो आणि परमेश्वरी स्वरुपाशी अनुसंधान लावून देतो. सद्गुरुच्या कृपेचे यथार्थ चित्रण ज्ञानेश्वरांनी या ठिकाणी केलेले आहे. सद्गुरुंची भेट झाल्यावर साधनांची धावाधाव संपून वृत्ती स्थिरावतात. अनेक नद्या महानद्या समुद्राला मिळून स्थिरावतात. शांत होतात. तशा आपल्या प्रवृत्ती सद्गुरुंच्या भेटीने स्थिरावल्या असे ज्ञानेश्वरांनी म्हटले आहे. अर्थात प्रवृत्ति स्थिरावतात म्हणजे त्या निर्जिव बनत नाहीत तर त्याला प्रशांत महासागराचे स्थिर स्वरुप मिळते. ही स्थिति सद्गुरु प्राप्त करून देतात. हे सर्व ते हळूवार चित्ताने करीत असतात. जीव हा सुखाचा लालची आहे म्हणून त्या करिता नाना तऱ्हेचे उपाय करीत असतो, धावाधाव करतो, प्रवाह पतित होतो. आणि एवढे करुनही त्याला इच्छित प्राप्त होतेच असे नसल्याने तो प्रवाह पतित रहातो. सद्गुरु मात्र आपल्या कृपेने त्याला स्वानंद महासुखाच्या सागरात नेऊन पोहचवितात. सर्व साधने सद्गुरुच्या कृपेने शांत होतात.

ज्ञानेश्वरांच्या गुरुंचे नांव निवृत्ती आहे. आता प्रश्न असा आहे की निर्वतन कशाचे करायचे? 'सर्वम् खलु इदम् ब्रह्म' म्हटल्यानंतर कोणता पदार्थ सद्गुरु आपल्या स्वरुपाबाहेर व कोठे घालवणार? असे कोणतेही स्थळ निवृत्त केलेले बाहेर ठेवण्यास नसल्याने आपल्या सद्गुरुंना निवृत्तीनाथ म्हणणें ज्ञानेश्वरांना अडचणीचे वाटू लागले. हे व्यावहारिक नांव त्यांना निरर्थक वाटले. ज्ञानेश्वर महाराज त्यातूनही मार्ग काढतात.



ते म्हणतात – सूर्याला 'तमारि' म्हणजे अंधाराचा शत्रू म्हणतात, तसे आम्ही निवृत्तीनाथ म्हणणार. वास्तविक सूर्याने अंधकाराचे नांवही ऐकलेले नसते वा त्याने अंधार पाहिलेलाही नसतो. तरी देखील आम्ही त्याला 'तमारि' म्हणतो. तसे व्यवहारात सद्‌गुरुंना निवृत्तीनाथ या नांवाने वंदन करतो.

**निवर्त्य तंव नाही। मा निवर्तवी हा काई।।**
**तरी कैसा वसे ठाई। निवृत्ति नामाच्या।। २-३३**
**परि सूर्यासी अंधकारू। कैं झाला होता गोचरू।।**
**परि तमारि हा डगरू। आलाचि की।। २-३४**

आपल्या सद्‌गुरुंशी असलेली एकरुपता वर्णन करतानां ते म्हणतात–

**कां सुवर्ण आणि लेणे। वसतें येके सुवर्णे।।**
**बसतें चंद्र चांदणें। चंद्रेंचि जेविं।। २-६२**
**नाना कापुरु आणि परिमळु। कापुराचि केवळु।।**
**गोडी आणि गुळु। गुळुचि जेंवी।। २-६३**
**तैसा गुरुशिष्यमिसें। हाचि येकु उल्हासे।।**
**जऱ्हीं कांहीं दिसें। दोन्हीपणें।। २-६४**

सोने आणि अलंकार, चंद्र आणि चांदणें, कापूर आणि सुगंध, गूळ आणि गोडी यात जसा फरक करता येत नाही तसे सद्‌गुरु आणि शिष्य यात नावाव्यतिरिक्त कांहींच भेद नाही. गुरुस्तवनाचा शेवट ज्ञानेश्वर महाराज अतिशय बहारीने करतात.

**आता ज्ञानदेवो म्हणे। श्रीगुरुप्रणामें येणें।।**
**फेडिलीं वाचाऋणें। चौहीं वाचांचीं।। २-८०**

शब्दद्वारें सद्‌गुरुंना वंदन करून ते कार्य साधून देणाऱ्या परा, पश्यन्ति, मध्यमा आणि वैखरी या चार वाचांच्या ऋणांतून मी मुक्त झालो आहे.

**कृष्णांजन एक वेळा डोळा घालिता अढळ।**
**तिमिरदु:ख गेले फिटले भ्रांती पडळ।**
**श्रीगुरु निवृत्तिराये मार्ग दाविला सोज्वळ।**
**बापरूखमादेविवरू विट्ठल दिनाचा दयाळ।।**

**- संत ज्ञानेश्वर महाराजांचा 'आंधळा'**

# संत एकनाथ

चिन्मयानंदरुपाय जनार्दनस्वरुपिणे।
स्वप्रकाशाय शुद्धाय आचार्याय नमोऽस्तुते।।१।।
मायातीताय नित्याय मायागुणप्रकाशिते।
व्यक्ताव्यक्तस्वरुपाय आचार्याय नमोऽस्तु ते।।२।।

— शुकाष्टक

गुरुचरणप्रतापें पुण्यपापें जळाली।
त्रिभुवनसमतीर्थे ज्ञानगंगे मिळाली।
शुभअशुभ पहातां भावना राम झाली।
निशिदिनिं सद्गुरुराया उन्मनीं झोप आली।।१।।

— एकनाथ

महाराष्ट्रातील संतपरंपरेत पैठणच्या एकनाथमहाराजांचे स्थान वैशिष्ट्यपूर्ण आहे. संत ज्ञानेश्वरांना जसे 'माऊली' म्हणून संबोधण्यात येते तसे एकनाथमहाराजांचा उल्लेख जवळीकेने 'नाथ' असा करतात. नाथांची वाङ्मयसंपदा प्रचंड आहे. या प्रचंड ग्रंथ संग्रहातून त्यांनीं सद्गुरुंचे माहात्म्य कृतज्ञतापूर्वक नमूद केले आहे.

## नाथांची ग्रंथसंपदा

नाथांनीं अनेक ग्रंथ व रचना केल्या आहेत. त्यातील प्रमुख म्हणजे श्रीमद्भागवताच्या एकादशस्कंधावरील टीका व भावार्थ रामायण असून चतुःश्लोकी भागवत, हस्तामलक, स्वात्मसुख, आनंदलहरी, शुकाष्टक, चिरंजीवपद असे छोटे ग्रंथ आहेत. याशिवाय हरिपाठ, हजारो अभंगही आहेत. संतवाङ्मयात नाथांना एक अभूतपूर्व स्थान त्यांच्या भारूडांनी दिले आहे. गौळणी, वासुदेव, आंधळे, पांगळे, मुके, बहिरा, जोगी हे वाङ्मय प्रकार अनेक संतांनी रुपकात्मक हाताळले आहेत. ह्या नाथांनी समाजातील व निसर्गातील अनेक गोष्टींचा उपयोग करून काव्य रचना केली. त्यालाच भारूड म्हटले जाते. त्यात जोशी, दादला, कान्होबा, सर्प, एडका, शिमगा, जोहार, मांग इत्यादि विषय आहेत. या प्रत्येकाची वैशिष्ट्ये, गुणविशेष, खाचाखोचा इत्यादि नाथांनी अचूकपणें हेरून त्यातून परमार्थाचा बोध खुबीने करून दिला आहे. ह्या त्यांच्या अपूर्वाईमुळे मराठी वाङ्मयात त्यांच्या भारूडांना आगळे महत्त्व प्राप्त झाले आहे.

## नाथांचे गुरु

नाथांचे गुरु जनार्दन स्वामी – दौलताबादचे किल्लेदार. आपल्या गुरुंबद्दल नाथांनी जागोजागी गौरवोद्गार काढलेले आहेत. जनार्दन स्वामी चाकरीत असूनही वृत्तीने पूर्ण विरक्त होते. ही चाकरी त्यांनी प्रपंच म्हणून केली परंतु वास्तविक परमार्थच साधला. सद्गुरुंच्या या वृत्तीचा ठसा नाथांच्या जीवनांवर खोलवर उमटलेला दिसतो. नाथांनी प्रपंच आणि परमार्थ दोन्हीही साधून गुरुंच्या उपदेशाचा व जीवनाचा समन्वय साधला. प्रपंचात राहून परमार्थवृत्तीने नाथ स्वत: जगले आणि त्याचबरोबर अनेकांना मार्ग दाखविला.

नाथांच्या कांहीं ग्रंथातील सद्गुरुंचे महात्म्य आपण येथे पाहू या. लेखाच्या प्रारंभी नमूद केलेले संस्कृत श्लोक नाथांनीं शुकाष्टकाच्या आरंभी सद्गुरुंना वर्णन करण्याकरितां लिहिलेले आहेत. जनार्दन स्वामींना सच्चिदानंदस्वरूपाने नाथांनी नमन केलेले आहे. त्यानंतर नमूद केलेला श्लोक नाथांनी चतु:श्लोकी भागवत टीका लिहिण्यास सुरुवात करण्यापूर्वी लिहिलेला आहे. नाथांनी आपल्या ग्रंथ रचनेची सुरुवात चतु:श्लोकी भागवतावरील टीकेने केलेली आहे. ती करतानां सद्गुरुंनी काय दिले याचा उल्लेख केला आहे. सद्गुरुंच्या चरणप्रतापामुळे आपली जन्मांतरीची पापे जळाली आणि त्रैलोक्याच्या तोडीची तीर्थे ज्ञानगंगेत म्हणजेच सद्गुरुस्वरूपात मिळाली. सद्गुरुंच्या कृपेने शुभाशुभ, चांगले-वाईट, सुख-दु:ख, मानापमान ही द्वन्द्वे ईश्वरस्वरूप झाली. नाथांनी आपली चतु:श्लोकी भागवतावरील टीका नाशिक येथे केली. त्याचे भान त्यांना असल्याने येथे त्यांनी आपल्या वृत्ति रामरूप झाल्याचे म्हटले. सद्गुरुंच्या सान्निध्यामुळें आपण उन्मनी अवस्थेत राहतो असे ते म्हणतात. सर्वसाधारण मनुष्य हा जागृति, स्वप्न व सुषुप्ति या तीन अवस्था जाणतो. स्वप्नावस्थेची व झोपेची जाणीव जागे झाल्यावर येते. या तीनही अवस्थांपलिकडील चौथी अवस्था म्हणजे 'उन्मनी' याची जाणीव विशिष्ट साधना झाल्यावर येते. मनाचे मनपण मोडल्यावर या अवस्थेत प्रवेश आहे. अशी ही दुर्लभ अवस्था आपल्याला सद्गुरुकृपेने लाभली व आपण स्वस्थ, शान्त झालो असे नाथ या ठिकाणी सांगत आहेत.

श्रीमद्भागवत या प्रचण्ड ग्रंथाचे सार म्हणजे चतु:श्लोकी भागवत होय. त्यावरील टीकेत नाथ सद्गुरुंना वंदन करीत आहेत–

**सालंकृत शुक्लांबरी। हंसारूढी परमेश्वरी।**
**सद्गुरुरूपे वागेश्वरी। म्या मजमाझारी वंदिली।।३।।**
**वाच्यवाचक वदता। तिहींसी आली एकात्मता।**

यापरी येथे वाग्देवता। गुरुत्वे तत्त्वता वंदिली।।४।।
पूर्वपरंपरा पूज्यता। एकरूप एकनाथा।
आम्हा सद्‌गुरूचि कुळदेवता। एकात्मता एकवीरा।।५।।

वाचारूपाने श्रीसद्‌गुरु सरस्वती झाले, तेथे बोलणारा, बोलविता व बोल एकच झाले आणि कुळदेवता एकवीरा एकात्मता सद्‌गुरुरूपाने नाथांनी वंदिली आहे.

गुरुसेवेहूनी वरुता। उपाय नाही परमार्था।
हे सत्यसत्य माझी वार्ता। वेदशास्त्रार्थां संमत।।१६।।
ते गुरुसेवेचि अभिनवखूण। स्वामीसेवक न होती भिन्न।
नुरवूनिया मीतूपण। सेवका जनार्दन संतुष्टे।।१७।।
एकात्मता श्रीजनार्दन। नुरवूनिया मीतूपण।
शिष्याची सेवा संपूर्ण। सर्वकर्मी आपण अंगिकारी।।२०।।
तव माझे जे का मीपण। ते सद्‌गुरु झाला आपण।
तरी करिताही विनवण। माझे मीपण नलगे।।२३।।

नाथांचे मीपण हे सद्‌गुरुस्वरूपात एवढे विलीन झाले की त्यांना त्याचा आठवच राहिला नाही. त्यांची सेवा सद्‌गुरुंनी अंगिकारली व ते संतुष्ट झाले. सद्‌गुरुकृपा झाली. कृतज्ञतेने नाथांनी आपले पूर्ण नाव टाकून सद्‌गुरुंचे नाव घेतले. सर्वत्र 'एकाजनार्दनी' हेच पत्करले. नावाकरिता सर्वसाधारण मनुष्य कितीतरी धडपडतो पण त्यांची करणीच जगावेगळी!

सद्‌गुरुंच्या कृपाप्रसादाने काय घडले ते 'आनंदलहरी' या १५४ ओव्यांच्या छोट्या प्रकरणग्रंथात नाथ सांगतात –

पूर्वी कर्म जे घडले। ते अळंकाराते आटिले।
ते नावपणासी मुकले। केवळ झाले सुवर्ण।।२१।।
जैसा वृक्ष छेदिलिया समूळ। आर्द्रता न तुटे तात्काळ।
आंगी असोनि अल्पकाळ। मग केवळ काष्ठ होय।।२२।।
घालूनी आशेचा पाश। हिंडवी नाना देश।
हिंपुटी करूनी देहास। संचित तैसे भोगवी।।२३।।
पत्रे आणि पुष्पेफळ। सहित वाळला समूळ।
अग्निसंगे केवळ। भस्म होय।।२४।।
तैसी सद्‌गुरुकृपा होय। तोडी विवेकाचेनि घाये।
देहे वृक्ष पाडिला पाहे। आर्द्रता राहे संचिताचि।।२५।।